गुरूवार, दिनांक २५ जुन, २०२०

अधिसूचना

क्रमांक : ४४/२०२० दिनांक : २५/०६/२०२०

विषय : पर्यावरण पुरस्कार - २०१९

सर्व सामान्यांच्या माहितीकरीता कळविण्यात येते की, पर्यावरण पुरस्कार प्रदान करण्यासंबंधीचे विनियम क्र. ४/२०१८ नुसार पर्यावरणासंबंधी विद्यापीठाला प्राप्त झालेल्या विविध पुरस्कारांच्या मूळ रकमेच्या व्याजातून विद्यापीठस्तरावर सुरु करण्यात आलेल्या **"पर्यावरण पुरस्कार -२०१९"** साठी **"गट - अ"** मधून **श्री गाडगे महाराज महाविद्यालय, मुर्तिजापुर, जि. अकोला** यांची पुरस्कार निवड समितीने एकमताने निवड केली आहे.

पर्यावरणासंबंधी वृक्षारोपन, जलव्यवस्थापन, जलसंवर्धन, जनजागृती, जैवविवधता संरक्षण, संवर्धन व व्यवस्थापन, अपारंपारिक उर्जा स्त्रोताचा वापर व प्रसार या संबंधित केलेल्या महत्वाचे व उत्कृष्ट कार्याबद्दल **"गट - अ"** मधून **श्री गाडगे महाराज महाविद्यालय, मुर्तिजापुर, जि. अकोला** यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा **'पर्यावरण पुरस्कार-२०१९'** घोषीत करण्यात आला आहे.

स्वा/-
(डॉ.तुषार देशमुख)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****

अधिसूचना

क्रमांक : ४५/२०२० दिनांक : २५/०६/२०२०

विषय : २०१८-२०१९ शैक्षणिक सत्राची स्व. श्री शंकरराव गोविंद जोग व श्रीमती पार्वतीबाई शंकरराव जोग शिष्यवृत्ती.

सर्व संबंधितांचे माहितीकरिता अधिसूचित करण्यात येते की, स्व. श्री शंकरराव गोविंद जोग व श्रीमती पार्वतीबाई शंकरराव जोग शिष्यवृत्ती दाननिधी विनियमातील तरतुदीप्रमाणे, उन्हाळी २०१८ मध्ये झालेल्या उच्च माध्यमिक शालांत परीक्षा, विज्ञान स्नातक भाग-१ व भाग-२ या परीक्षांमध्ये पदार्थ विज्ञान या विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करुन प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण होणारे व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अनुक्रमे विज्ञान स्नातक भाग-१, भाग-२ व भाग-३ च्या अभ्यासक्रमास पदार्थ विज्ञान विषयासह २०१८-२०१९ शैक्षणिक सत्रामध्ये प्रवेश घेतलेले खाली नमूद केलेले विद्यार्थी २०१८-२०१९ शैक्षणिक सत्राच्या स्व. श्री शंकरराव गोविंद जोग व श्रीमती पार्वतीबाई शंकरराव जोग शिष्यवृत्तीकरीता पात्र ठरले आहेत.

२०१८-२०१९ या शैक्षणिक सत्राची उपरोक्त शिष्यवृत्ती खालील विद्यार्थ्यांना त्यांच्या नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे प्रदान करण्यात येत आहे.

अ.क्र.	नांव व महाविद्यालय	उत्तीर्ण परीक्षा	प्रवेशित वर्ग	प्राप्त गुण	शिष्यवृत्तीची रक्कम
०१.	**श्री कौस्तुभ विनोदराव तायडे** ब्रजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती.	H.S.S.C.	B.Sc. I	100	500.00
०२.	**कु. ऋतुजा संजयपंत पाटील** विद्याभारती महाविद्यालय, अमरावती.	B.Sc. I (Sem I+II)	B.Sc. II (Sem III)	297	500.00
०३.	**कु. वैष्णवी नंदकिशोर निलखन** श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.	B.Sc. II (Sem III+IV)	B.Sc. III (Sem V)	290	500.00

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

अधिसूचना

क्रमांक : ४६ /२०२०. दिनांक : २५.०६.२०२०

विषय :- अभ्यासक्रम बंद करण्याबाबत...

सर्व संबंधीतांचे माहीतीकरीता सुचित करण्यात येते की, मधुकरराव पवार कला महाविद्यालय, मूर्तिजापूर, (२३५) ता.मुर्तिजापुर, जि. अकोला, या महाविद्यालयातील Diploma in Retail Management हा अभ्यासक्रम बंद करण्यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ मधील कलम १२० नुसार संपुर्ण प्रक्रिया पुर्ण करण्यात आली असुन या बाबत विद्या परीषदेच्या दि.१३.१.२०२० रोजीच्या सभेत विषय क्र.०९ अन्वये या महाविद्यालयातील Diploima in Retail Management या अभ्यासक्रमाचे संलग्निकरण काढुन टाकण्याची अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस विद्या परिषदेने मान्य केलेली आहे.

त्यानुसार खालील तक्त्यामध्ये दर्शविलेले महाविद्यालयातील Diploma in Retail Management हा अभ्यासक्रम बंद करण्यात येत आहे.

आदेशान्वये.

अ.क्र.	संस्थेचे नांव	महाविद्यालयाचे नांव व सांकेतिक क्रमांक	महाविद्यालयातील अभ्यासक्रम
१.	२.	३.	४.
१.	प्रतिभा शिक्षण प्रसारक मंडळ,जनुना.ता.बार्शिटाक्ळी जि.- अकोला.	मधुकरराव पवार कला महाविद्यालय, मूर्तिजापूर, (२३५) ता.मुर्तिजापुर, जि. अकोला,	Diploma in Retail Management.

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****